Vol III Issue VII Jan 2014

Impact Factor : 1. 9508(UIF)

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR :** 1. 9508(UIF)

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3 | Issue-7 | Jan-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# *लोकनाटय : दंढार*

***पी. आर. पुंडकर***

मराठी विभाग प्रमुख, महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड, जि. अमरावती.

***सारांश :-*** लोककलांनी महाराष्ट्राची संस्कृती समृध्द आणि वैभवशाली केली आहे. त्यात लोकनाटयाचा वाटा महत्वपूर्ण आहे. लोकनाटयाचा उगम हा मनोरंजनासाठी झालेला आहे. परंतु केवळ मनोरंजनच नव्हे तर रंजनातून लोकप्रबोधनाचे कार्य लोकनाटयाने केले आहे. ग्रामीण लोकजीवनातील सामान्य जनांचे जगण्याचे विषय घेऊन त्यांचे रंजन करण्याचे कार्य काही हौशी लोककलावंतानी लोकनाटयाद्वारा केले आहे यात प्रामुख्याने तमाशा, दंढार, खडी गम्मत इत्यादीचा वाटा मुख्य आहे.

## *प्रस्तावना :*

प्रयोगरूप लोककलांचा अभ्यास करताना लक्षात येते की, या लोककलांचा उगम हा धार्मिक श्रध्देतून झाला आहे कालौघात त्यात रंजनाचे घटक आलेले आहेत. त्यालाच आपण लोकनाटय म्हणून संबोधतो भारतात आदिम जमातीनी रंगभूमीचा प्रारंभ नृत्याने केला. लोकजीवनातील प्रचलित असलेल्या धार्मिक विधीनाटयाचा उगम सुध्दा प्राचीन काळातील विधी आचरणातून झालेला आहे असे पाश्चिमात्य वैदिक पंडित पिशेल यांनी सिध्द केले आहे. आजही ग्रामीण भागात देव–देवतांच्या उत्सव प्रसंगी लोकनाटयाचे प्रयोग होतात. विधीनाटयातूनच लोकनाटयाचा उगम झालेला आहे. लोकनाटयाच्या सादरीकरणात विधीनाटयाची बिजे रूजलेली आहेत.

## *लोकनाटयाची परंपरा :–*

महाराष्ट्रात रूढ असलेल्या करमणुकीया कलाप्रकारांना प्राचिनता आहे. इसवीसनाच्या पहिल्या शतकात होऊन गेलेल्या 'हाल' राजाच्या काळापासून त्याचे अवशेश सापडतात गाथासप्तशथी त्याचा उल्लेख आलेला आहे. विदर्भातील दंढारीच्या उदयाच्या खाणाखुणा आदिवासीच्या नृत्यात दिसून येतात. दंढरीत असणारी टिपरीनृत्य हे पूर्वी आदिवासी कोलाम जमातीत प्रचलित होते. त्या नृत्याचा उगम धार्मिकतेतून झाला आहे. आदिम मानवाची अशी धारणा होती की त्यांना ही नृत्ये मोठया देवाने दिली, शिकविला 'कांबडा' नाच नारद देवाने कनकसरी मातेला प्रसन्न करण्यासाठी केला'. राजनेगी राजा बनवून वाजविण्याची कला परधानांना स्वप्नात सांगितली. अशा तऱ्हेच्या आख्यायिका आदिवासीच्या लोकात प्रचलित आहेत. नृत्य हा आदिवासींच्या आदिम शक्तिपूजेचा परिपूर्ण नमुना आहे. त्यांच्या नृत्यातून संपूर्ण धार्मिकता प्रत्ययास येते. आदिवासी जनजीवनातील गीत, नृत्याला असलेले महत्व लक्षात घेता लोकनाटय ही लोककला फार प्राचीन असावी असे लक्षात येते. प्राचीन वाङ्मयातही अशा प्रयोगरूप लोककलांचा उल्लेख आलेला आहे. यादव काळात तमाशा करणाऱ्यांच्या यादीत कोल्हाटणी, अस्वलवाले, दरवेशी, बहुरूपी, वासुदेव, पिंगळा इत्यादींना गावकीच्या उत्पन्नातून 'देकार' नावाची देणगी बाजूला काढून ठेवली जाई. तसेच श्री ज्ञानेश्वरीत असा उल्लेख आलेला आहे.

ते मुद्दल स्वरूप तुझे । जेथुनि इथे द्विभूजे चतुर्भूजे ।
सोआंग सुरकार्यान्येनिय व्याजे । घेवो घेवो येसी ।। (श्री ज्ञानेश्वरी 11–83)[2]

मनुष्यजातीच्या कल्याणासाठी प्रत्यक्ष परमेश्वर सोआंग अवतरतो अशी भारतीय समाजमनाची धारणा आहे. समांग, स्वांग, सोंग असा लोकभाषेत शब्द प्रचलित आहे धार्मिक प्रसंगी सोंगे काढण्याची प्रथा यादवकाळात प्रचलित होती. म्हणूनच वरील ओवीत तसा संदर्भ दिसतो.

स्वांग जवनिके आडैनि आवधे दीसे : व्यक्त न देखिजे :
मोटकी जवनिक फेडीजे : आन सावे व देखिजे :[3]

या दृष्टांतावरून यादवकालीन विविध ग्रंथामध्ये यादवपूर्व कालापासून महाराष्ट्रात सोगीनाटयाचा प्रकार अस्तित्वात असल्याचे स्पष्ट

जाणवते. प्रयोगरूप नाटयात तेव्हा दर्शनी पडदा जरी नसला तरी देवतांचे अवतरण होताना अंतर्पटाचा उपयोग होत होता. जवनिका म्हणजे पडदा, अंतर्पट, मंचावरील पडदयाआतील सोंग जाणवते पण स्पष्ट दिसत नाही. वस्त्र दूर केल्यानंतरच सोंगाचे दर्शन घडते असा अभिप्राय सोंगीनाटय पाहिलेल्या महात्मा चक्रधरांनी दिला आहे महात्मा चक्रधरांचा सर्व स्तरातचा आणि परिसरात मुक्त संचार असल्याने लोकजीवनातील लोकसंचितावर ते प्रकाश टाकतात.

### *सोंग आणि श्रध्दा :–*

देवतांचे सोंग घेणे हा श्रध्देचा भाग आहे. सोंग घेतलेल्या व्यक्तीच्या अंगता देवतेचा संचार होतो. अशी लोकधारणा आहे. हया देवता मनोकामना पूर्ण करू शकतात. अरिष्टाचे निवारणा करू शकतात आणि आपणास सौख्य प्रदान करू शकतात. अशी लोकश्रध्दा ग्रामीण लोकजीवनात आहे. मंचावरील सोंगाचे आगमन म्हणजे देवतांचे अवतरण असे येथे मानले जाते.

### *विदर्भातील लोकनाटय : दंढार*

विदर्भातील सर्वाधिक प्रचलित पारंपरिक नाटयप्रकार म्हणजे दंढार होय. यात प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. एक म्हणजे प्रसंगी दंढार होय. या दंढारीकडे धार्मिक परंपरेचा भाग म्हणून तिच्याकडे पाहिले जाते आणि दुसरी ती भडकी दंढार होय या दंढार लोकनाटयाचे प्रयोग साधारणतः दिवाळी पासून सूरू होतात. निखळ मनोरंजन हाच उद्देश दोन्ही दंढार लोकनाटय कलाप्रकारांचा आहे.

ग्रामीण भागात दंढारीसाठी दंढार किंवा गंढार हया संज्ञा रूढ आहेत. ग्रामीण लोकजीवनाची नाटयाची भूक भागविणारा हा कलाप्रकार आहे. डॉ. मधुकर वाकोडे दंढार शब्दाची उत्पत्ती पुढील प्रमाणे करतात. ''दंढार हा शब्द दण्डा + आर = दंढार असा बनला दण्ड म्हणजे टिपऱ्या आणि आर म्हणजे उंच सुरात म्हणावयाचे गाणे.''[4] तसेही खेडयात 'बंद करन तुहय गंढार' अशी लोकोक्ती प्रचलित आहे. गंढार वरून दंढार शब्द रूढ झाला असावा.

दंढार हा कलाप्रकार संगीताश्रयी असल्याने त्यात अनेक रंगकर्मीचा सहभाग असतो. दंढाराच्या प्रयोगात टिपऱ्या धारण करून जवळपास आठ–दहा रंगकर्मी प्रथम नाच करतात. वातावरण निर्मिती करतात. एक दोन ढोलकी वादक, चोंडक, मंजिरा, लोखंडी कडी तीन–चार जिलंकरी इत्यादींचा वादयमेळ दंढारीत असतो. दंढारीच्या सादरीकरणाचे दोन भाग पडतात. पहिला पूर्वरंग आणि दुसरा उत्तररंग, पूर्वरंगात गण, नमन, आणि गौळण तर उत्तररंगात भावबतावणी, लावणी, फटका व शेवटी मारूतीला आरती याप्रमाणे दंढार नाटयाचे सादरीकरण होते.

विदर्भातील अमरावती जिल्हयात जामगांव खडका येथे कार्तिक पौर्णिमेला तीन दिवस धार्मिक परंपरेचा भाग म्हणून पारंपारिक दंढार सादर होते. तिला या परिसरात 'नवसाची दंढार' म्हणून संबोधले जाते. श्री घोंगडे पाटलाकडे या दंढार उत्सवाची परंपरा आजही टिकून आहे. या उत्सवाला जवळपास तीनशे वर्षाचा पूर्वइतिहास आहे. ही परंपरा टिकून राहण्यासाठी त्यांच्या पूर्वजांनी दंढार उत्सव संवर्धनासाठी कायमस्वरूपी चार एकर शेतीची वहिवाट लावून दिली आहे. कुटुंबातील जो कुणी ही शेती करणार त्यांनी त्यावर्षी हा उत्सव करावा. त्यानुसार दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला हा उत्सव मोठया श्रध्देने, उत्साहात दंढार उत्सव येथे होतो त्याबाबत गावच्या काही लोकधारणा आहेत. हा दंढार उत्सव कुटुंबाला करावाच लागतो. जर नाही केला तर घरावर संकटे येतात. कुटुंबातील लोक आजारी पडतात. दंढार मंडळी एखादया वर्षी नाही आली तर कुटुंबातील पुरूष मंडळींनी पायात चाळ बांधावे आणि टिपऱ्या घेऊन फेर धरावा लागेल. परंतु असे कधी झाले नाही. दरवर्षी परिसरातील दंढार मंडळी श्रध्देने येथे येतात. येथूनच त्यांचे वेगवेगळया गावात प्रयोग करण्याच्या दृष्टीने प्रारंभ होतो. म्हणूनच या गावातील कार्तिक पौर्णिमेला भरण्याऱ्या दंढार उत्सवाला 'मानाची दंढार' म्हणतात. जवळपास पंधरा दिवसआधी कुटुंबातील कर्ती मंडळी परिसरातील दंढार मंडळांना निमंत्रण देतात. दंढार मंडळींसुध्दा मोठया श्रध्देने या गावात येतात ते येथे दंढार सादरीकरणासाठी मानधन घेत नाहीत. कुटुंबातील लोक सुध्दा दंढार सादरीकरणात आपला सहभाग नोंदवितात. दुसऱ्या दिवशी सकाळी गावात घरोघरी जाऊन ही मंडळी नृत्य, गाणी गाऊन गौळण सादर करतात. तेव्हा त्यांना चांगली बिदागी मिळते. श्री घोंगडे परिवार त्यांना कपडयांचा अहेर करतात. त्यांची सन्मानपूर्वक बिदाई करतात. यजमानाकडून गावकऱ्यांना भोजन दिल्या जाते.

कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेला रात्री आठ–नऊ वाजता परंपरेनुसार ठरलेल्या जागी दंढार सादरीकरण होते त्याला होमाची जागा म्हणतात. तेथे कुटुंबातील मंडळी व हौसी कलावंत टिपरी नृत्य सादर करतात ढोलकी, चोंडका, मंजिरा आणि टिपऱ्या इत्यादी लोकवादयाच्या साथीवर दंढार सादर होते. सुरवातीला टिपरी नृत्य सुरू होते. या टिपरी नुत्याचा वेळी गीताची एकच ओळ पुन्हा पुन्हा आळवतात.

रामा हो रामा.......... रामा हो रामा

टिपरीनृत्य सुरू झाले की गावातील, परिसरातील रसिक नियोजित स्थळी आसनस्थ होतात. जवळपास अर्धा तास ही वातावरण निर्मिती केल्या जाते. नंतर टिपऱ्यांच्या तालावर गण गायिल्या जातो. गणातून ग्राम दैवतांना आवाहन केल्या जाते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व गावावर कृपादृष्टी ठेवण्यासाठी देवतांना गणातून आवाहन केल्या जाते.

आता गातो मी गण........ करतो देवाले नमन<br>
नाचत आले गणपती...... संगे सारजा सोबती<br>
नमन गावच्या मारूतीले....... नमन गावच्या पाटलाले<br>
नमन सर्व देवदेवताले......... सुख ठेवजो रयतेले<br>
यश देजो दंढारीले......... यश देजो दंढारीले

गणानंतर रंगमंचावर एका बाजूने श्री गणपती तर दुसऱ्या बाजून देवी शारदा यांचा नृत्यगायनाने प्रवेश होतो. तेव्हा टिपरीनृत्य सुरूच असते.

शाहीर गीत गातो.
गणपती राजा हो......... चला रंगणी तुम्ही आता हो......
सारजा ब्रम्हाची कुवरे......... स्वार झाली हो हंसावर रे

श्री गणपती व देवी शारदा यांचे रंगमंचार नृत्य सुरू होते. सोबत टिपर नृत्याची साथ असते. श्री गणपती व देवी शारदेचे नृत्य गायत झाल्यानंतर दंढारीला प्रारंभ होतो वेगवेगळया गावातून परिसरातून आलेल्या होशी दंढार मंडळीला आपली कला सादर करण्यास किमान अर्धा अर्धा तासाला अवधी दिल्या जातो. या वेळात त्या मंडळाने आपली कला सादर करावी त्या सादरीकरणाचे परीक्षक निरीक्षक दर्शक असतात.

***गौळण :–***

दंढारीतील गौळण म्हाणजे जनसामान्याच्या मनाचा ठाव घेणारे नृत्य नाटय आहे. तमाशात जसा गण झाल्यानंतर गौळण असा क्रम आहे. तसा दंढार लोकनाटयातही आहे. फरक एवढाच आहे की दंढार लोकनाटयातील गौळण परंपरागत मौखिक स्वरूपाची असते. दंढारीतील गौळणीत राधाकृष्ण, श्रीकृष्णाच्या रासलीला, कृष्णगोपी इत्यादीचे श्रृंगारिक वर्णने येतात व गौळणीत गोपी आणि राधा, गोपी आणि कृष्ण, राधा आणि मावशी, कृष्ण आणि राधा यांच्यात प्रहसनात्मक नाटय असते या नाटयाचे स्वरूप गेय असते. उदा.–

दहा पाच नि आल्या गौळणी
माठ गोरसाचा घेवूनी शिरी
बेगी वेगी चाला बाई येळ लई झाला
केव्हा होईल आपली इकरी...............

या आणि अशा तऱ्हेने गद्य–पद्य मिश्रित संवाद राधा आणि मावशी किंवा कृष्ण यांचे संवाद गौळणीतून सादर होतात मथुरेच्या बाजाराला जाताना कृष्ण आपली खोड काढणार, रस्ता अडविणार, कृष्ण आणि त्याचा सोबती पेंदया हा गौळणीचा रस्ता अडवितो. त्यांना टॅक्स मागतो. अथात हे संदर्भ आजचे आहेत. दंढारीतील कलावंत बदलत्या काळातील संदर्भ आणि त्यातही आपल्या सोईनुसार बदल करून नाटयरूप देतात.

हे कसब वैशिष्टपूर्ण आहेत. प्रेक्षकांना ते खूप आवडतात. हयातील विडंबन प्रेक्षक रंजन म्हणून स्वीकारतात. येथे कुणाच्या धार्मिक भावनेला ठेव लागत नाही. दंढारीतील सादर होणारी गौळण ही कुठल्याही पुराण कथेत सापडणार नाही ती कलावंताची स्वतंत्र निर्मिती असते.

***झडती अर्थात भावबतावणी :–***

दंढारीतील उत्तररंगात झडती अर्थात भावबतावणी सादर होते. झडती म्हणजे गद्य–पद्य मिश्रित कथागीत असते आणि या कथागीताला अनुरूप दंढारीतील कलावंत अभिनयात ती कलावस्तू रसिकासमोर उभी करतात. त्यालाच भावबतावणी म्हणतात. भावबतावणीतील कथा ही धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक, कौटुंबिक तसेच वर्तमान घडामोडीवर आधारित असते शाहीर कथागीत गातो आणि नाच्या व इतर पात्रे नृत्यगायनातून तसेच नाटयातून ती कथावस्तू अभिनयाद्वारे सादर करतात. भावबतावणी हा दंढारीचा आत्मा आहे.

***सवाल जवाब :–***

दंढारीच्या उत्तररंगात भावबतावणी नंतर शाहिरात परस्परात वाद निर्माण होतात. एकमेकांना कमी लेखण्याचा प्रयत्न करतात. एकमेकांना प्रश्न विचारून निरूत्तर करण्याचा प्रयत्न करतात. यालाच सवाल जवाब म्हणतात. तमाशात हा कलाप्रकार सादर केला जातो. यालाच दंढारीत कलगी तुर्रा असेही म्हणतात. यालाच शिव आणि शक्तीपंथ असेही म्हणतात. शिव आणि पार्वती दोघेही पतीपत्नीच्या रूपात दंढारी वावरतात. दंढारीतील शाहीर हा शिव बनतो आणि नृत्य करणारा नाच्या पोरगा ही पार्वती होते यांच्यात वादसंवाद चालतो. त्यालाच हे लोक कलगी तुर्रा म्हणतात. हे वाद कधी कौटुंबिक स्वरूपाचेही असतात. उदा–कुटुंबातील पती पत्नीच्या नात्यातील संशय हा सर्वश्रृत आहे. कधीकधी सवाल जबावावर अश्लितेचा आरोपही होतो. त्याला कारण मराठी ग्रामीण बोली द्वयअर्थी आहे. बोलीतील रचनेच्या उच्चरावरून कधी विनोद निर्माण होतो. उदा–

सवाल – कोणाले धरत होती ?कोणाला फिरत होती ?
कोणाच्या मुखात ग नारी घास भरवत होती ?
जवाब – जात्याले फिरवत होती, खुटयाले फिरवत होती
जात्याच्या मुखामंदी हो राया दाणे टाकत बसली होती

अशा प्रकारच्या प्रश्नोत्तरासाठी कलावंत हा हजर जवाबी पाहिजे कधी कधी हिंदी भाषेचाही खुमासदार वापर शाहीर सवाल जवाबासाठी करतो.

मै मरा तेरे लिए लेकिन तू मत मरना मेरे लिए

लेकीन तू मरी मेरे लिए तो बाहर खडा तेरे लिए

या प्रश्नामध्ये लौकिक अर्थाने प्रियकर आपल्या प्रेयसीला म्हणतो अर्थात येथे गांडुळ व मासोळी हया प्रतिमा घेतलेल्या आहेत गांडुळ हा मासोळीला म्हणतो नदीकाठी बसलेल्या माणसाने तू गळाला लागली पाहिजे म्हणून मला गळाला लावले आहे. परंतु तू त्यात अडकू नकोस. तू जर अडकली तर काठावर बसलेला माणूस तुझी शिकार करणार. असा मासळीप्रती समर्पण भाव वरील सवालात आहे. अशा प्रकारचे प्रश्न प्रतिप्रश्न दंढारीत सवाल जवाबाच्या माध्यमातून गद्य–पद्य मिश्रित स्वरूपात विचारले जातात.

***लावणी :–***

तमाशातील लावणीप्रमाणेच दंढारीतही लावणी सादर केला जाते. लावणीचे विषय जरी वेगवेगळे असले तरी लावणीचा मुख्य भाव हा श्रृंगार हाच असतो. शृंगारासाठीच लावणी जन्माला आली आहे. लावणीत विरह, सख्याचा सहवास, प्रेमाचा अनुभव, पुनर्मिलन इत्यादी विषय लावणीत सादर होतात. लावणी ही ऐकायची नसते तर ती पाहायची असते. लावणीत गीत, संगीत, नृत्य आणि अभिनय याचा संयोग असतो. दंढारीत शाहीर लावणी गातो आणि नाच्या पोरगा त्यावर नृत्य सादर करतो.

करून तू चांगभांग, घरी नाही हटकायला
पाहून जवान पोरं जात मटकायला
नवनवतीची पोरी तुही जवानी
जवानीच नोको करू पोरी तू पाणी

अशा तऱ्हेच्या लावणीत शृंगारिक वर्णन येतात. पण कुठेही यात अश्लिलता नसते. निखळ शृंगारिकभाव लावणीतून साकार होतात.

***फटका :–***

फटका हा कलाप्रकार दंढारीच्या उत्तररंगात शेवटी शेवटी सादर केला जातो. या प्रकारात एक शाहीर दुसऱ्या प्रतिपक्षाला कमी लेखतो, तुच्छ लेखतो, त्यांना चिडवतो. यातूनच हा कलाप्रकार जन्माला आला आहे यात अश्लिलता भरपूर प्रमाणात असते प्रसंगी अश्लिल शिव्याही दिल्या जातात

पद्रील मीस वालाच नकटीले कौतुत बोलाच
उश्टीले नवल कवलाचं जी जी रे जी......
किंवा
पक्के गुरू का मै चेला, पक्की मेरी मॉ
अन् हकाल तेरी बंडी रस्ता गावका देख'

दंढारीत जेव्हा प्रतिपक्षाची हार होते, तो पराजित होतो, तेव्हा तो चिडून अशा प्रकारच्या मनातील भावना व्यक्त करतो. एक प्रकारे त्यांच्या भावनेचे विरेचन या प्रकारात होते.

दंढार नाटयाला शेवट नसतो. रात्रभर चालणारी दंढार सूर्योदय होताना तिचा शेवट होतो. दंढारीच्या शेवटी पुन्ही भाविक वातावरण निर्माण होते लोकांच्या श्रध्दा उचंबळून येतात. रंगमंचाच्या एका बाजूला हनुमंताचे सोंग आणि दुसऱ्या बाजूला तारकासुराचे सोंग आणल्या जाते. गावकरी मोठया श्रध्देने हे सोंग पाहण्यासाठी गर्दी करतात. सर्व वातावरण भारलेले असते सर्वत्र गोमुत्राचा शिडकाव केल्या जातो हनुमंतधारी व तारकाधारी माणसाच्या अंगात भारलेपण संचारते. ते नाचत नाचत एकमेकांच्या अंगाला स्पर्श करतात आणि बेहोश होतात. श्रध्दाळू लोक तेथे कापूर जाळतात. लोक काही वेळ स्वतःला विसरून जातात तेव्हाच कुटुंबातील लोक आरतीला प्रारंभ करतात.

आता करावे आरती लावून कापूराच्या ज्योती
लहानपण देगा देवा, तुझा विसर न व्हावा
धन्य काय हा दिवस आज पुरला नवस
दंढार नवसाची आहे, आम्ही चालवित आहे
तुका वाजवितो टाळी, उभा संन्यास्या जवळी

शेवटी नारळ फोडून यजमान सर्वाच्या पाया पडतो साश्रूनयनांनी सर्वाचा निरोप घेतात कुटूंबातील मंडळी सर्वाचे आशीर्वाद घेतात आणि दंढारीतील कलावंत गावात गौळण काढतात. प्रत्येक कलावंताना आपल्या आपल्या ऐपतीप्रमाणे बिदागी मिळते. यजमान दंढार कलावंताना कपडयालत्याचा अहेर करतात. त्यांची सन्मानपूर्वक बिदाई करतात म्हणूनच तर दरवर्षी जामगांवला मोठया श्रध्देने दंढार रंगकर्मी येतात आणि आपली कला सादर करतात.

एकूणच गीत, संगीत, नृत्य आणि अभियन याचा संगम म्हणजे दंढार नाटय आहे हे नाटय कधी न संपणारे असे आहे. शेवट हा करावाच लागतो. दंढार या लोकनाटयाला सामान्य जनांचे प्रतिबिंब पडलेले आहे. आजही ही लोककला लोकाश्रयावर जिवंत आहे.

*संदर्भ :–*

1. डॉ. पंजाब पुंडकर – 'लोकधारा स्वरूप आणि शोध', नभ प्रकाश अमरावती
2. नाना महाराज साखेर कृत – 'सार्थ ज्ञानेश्वरी', सारथी प्रकाशन पुणे
3. श.गो.तुळपुळे – 'दृष्टांतपाठ', व्हिनस प्रकाशन पुणे
4. डॉ. मधुकर वाकोडे – 'लोकप्रतिका आणि लोकतत्व', लोकवाङःमय गृह मुंबई

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net